जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक -७९२ दिनांक - ०७/११/२०२३**

हडपसर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## बाबु नामदेव मिरेकर (टोळी प्रमुख) व त्यांचे इतर ०८ साथीदार यांचेवर मकोका अंतर्गत कारवाई

यातील फिर्यादी यांचा मुलगा यास दिनांक १७/०९/२०२३ रोजी मिरेकर वस्ती,हडपसर,पुणे या ठिकाणी आरोपी सनी कांबळे, अमन शेख, आकाश कांबळे व तीन विधीसंघर्षीत बालके यांनी संगनमत करुन,पुर्वीच्या भांडणाचा राग मनात धरुन,त्यांचेकडील धारदार लोखंडी हत्यारांनी फिर्यादी यांच्या मुलांच्या डोक्यावर जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने वार करुन,त्यास जीवे ठार केले व धारदार हत्यारे हवेत फिरवुन आमच्या सोबत कोणी पंगा घेतला तर असाच एका-एकाचा मुडदा पाडु असे जोर-जोरात बोलुन सदर परीसरात दहशत पसरवली म्हणून फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून **हडपसर पोलीस स्टेशन गु.र.नं. १४०६/२०२३,भादविक ३०२,१२०(ब),१४३,१४४,१४७,१४८,१४९,३४,महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१)सह १३५,भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५),क्रिमिनल लॉ अॅमेडमेंट कायदा कलम ३ व ७** प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

दाखल गुन्हयाचा **हडपसर पो स्टे व गुन्हे शाखा युनिट ०५ हे समांतर तपास करीत असताना**,त्यांना त्यांचे बातमीरादारामार्फत मिळालेल्या बातमीवरुन व सापळा लावुन दाखल गुन्हयातील निष्पन्न झालेले आरोपी **१)बाबु नामदेव मिरेकर,वय ५४ वर्ष,वैदुवाडी,हडपसर,पुणे (टोळी प्रमुख),२)आकाश हनुमंत कांबळे,वय २० वर्ष,रा.सदर ३)अमन नवीन शेख,वय २३ वर्ष,रा.गोसावी वस्ती,हडपसर,पुणे ४)सरताज नबीलाल शेख,वय २० वर्ष,रा.वैदवाडी,हडपसर,पुणे ५)सनी रावसाहेब कांबळे,वय २३ वर्ष,रा.मिरेकर वस्ती,शंकर मठ,वैदवाडी पुणे ६)रोहित शंकर हनुवते,वय २२ वर्षे,रा.नवीन म्हाडा बिल्डींग,हडपसर,पुणे (टोळी सदस्य) यांना अटक केलेली असुन,तीन विधीसंघर्षीत बालके ताब्यात घेतली आहेत.**

सदर आरोपीचे पुर्व रेकॉर्डची पाहणी करता नमुद गुन्ह्यातील आरोपी बाबु नामदेव मिरेकर (टोळी प्रमुख) याने स्वतःचे नेतृत्वाखाली संघटीत टोळी तयार केली असुन त्यामध्ये वेगवेगळे सदस्य घेवुन टोळीतील सदस्यांनी एकट्याने किंवा संघटीतरित्या लोकांना घातक शस्त्राने जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे,घातक शस्त्र बाळगुन जबर दुखापत करणे, जबरी चोरी करणे, नागरीकांमध्ये दहशत निर्माण करणे,खंडणी स्वरुपात पैसे उकळणे,छोटे व्यवसायिक व दुकानदार तसेच पथारीवाले यांना दमदाटी करुन त्यांचेकडुन फुकट वस्तु घेणे, अशा प्रकारचे गुन्हे त्याचे विरुध्द पुणे शहरातील वेगवेगळया पोलीस ठाण्यात गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल असुन त्यांनी हडपसर परिसरात दहशत निर्माण केली आहे.

दाखल गुन्ह्यास महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियत्रंण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)**(i)**,३(२), ३(४) या कलमाचा अंतर्भाव करण्याचा प्रस्ताव हडपसर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.रविंद्र शेळके यांनी पोलीस उप-आयुक्त,परि-०५,पुणे,श्री.विक्रांत देशमुख यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा यांचे कार्यालयात प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रकरणाची छाननी करून हडपसर पोलीस स्टेशन गु.र.नं.१४०६/२०२३ भादविक ३०२,१२०(ब) १४३,१४४,१४७,१४८,१४९,३४,महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)सह१३५,भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५),क्रिमिनल लॉ ॲमेंडमेंट कायदा कलम ३ व ७ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्ह्यामध्ये महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियत्रंण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(i),३(२),३(४) या कलमाचा अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा यांनी मान्यता दिलेली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास सहा.पोलीस आयुक्त,हडपसर विभाग पुणे श्रीमती.अश्विनी राख ह्या करीत आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त पुणे,श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त,परी-०५,पुणे,श्री.विक्रांत देशमुख, मा.सहा.पोलीस आयुक्त,हडपसर विभाग,पुणे,श्रीमती.अश्विनी राख त्यांचे मार्गर्शनाखाली हडपसर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.रविंद शेळके, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.विश्वास डगळे, श्री.संदिप शिवले, म.सहा.पोलीस निरीक्षक,श्रीमती.सारीका जगताप, सहा. पोलीस निरीक्षक,प्रमोद दोरकर हडपसर पो.स्टे.निगराणी पथकातील पोलीस अंमलदार,प्रविण शिंदे,महेश उबाळे,राजश्री खैरे,वसीम शेख,गिरीश एकोर्गे,बाबा शिंदे,रामश्वेर नवले यांनी केलेली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पुणे पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार स्वीकारल्या नंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारीक लक्ष देवुन,शरीराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व समाजा मध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश दिले आहेत. **त्यांचे मार्गदर्शना खाली मोक्का अंतर्गत केलेली ही ८० वी कारवाई आहे.**